# P18/AGR221/EE/20160305

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कृषि-पत्रकारितेची व्याख्या लिहून कृषि-पत्रकारितेचे महत्व थोडक्यात स्पष्ट करा. 5

ब) कृषि-पत्रकारितेची विविध तत्वे लिहून कोणतेही एक तत्व स्पष्ट करा. 5

क) 'समयोचित माहिती देणे' या कृषि-पत्रकारितेच्या उद्दिष्टाविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

ड) कृषि-पत्रकारितेच्या कार्यांची यादी देऊन कोणत्याही एका कार्याविषयी माहिती लिहा. 5

इ) बातमीची वार्तामूल्ये लिहून 'कालसापेक्ष नाविन्य' हे वार्तामूल्य स्पष्ट करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) यशोगाथा म्हणजे काय ते स्पष्ट करा. 5

ब) कृषि-पत्रकारितेचे प्रकार लिहून मुक्त कृषि-पत्रकारितेत कोणत्या बाबी लक्षात ठेवाव्यात ते नमूद करा. 5

क) वृत्त संपादकाच्या विविध जबाबदाऱ्या लिहा. 5

ड) मांडणी व सजावटीची तत्वे थोडक्यात स्पष्ट करा. 5

इ) कृषि-वार्ताहराच्या 'बातमी शोधण्याची दृष्टी' या गुणाचा अर्थ स्पष्ट करा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) लिखाणाची क्लिष्टता कोणत्या गोष्टींवर अवलंबून असते ते लिहा. 5

ब) मुलाखतीचे दोन प्रकार उदाहरणासह स्पष्ट करा. 5

क) वृत्तलेखाचे प्रमुख घटकांची थोडक्यात माहिती द्या. 5

ड) 'संपादकीय पान' या विषयावर थोडक्यात माहिती लिहा. 5

इ) लेखमाला म्हणजे काय ते लिहून खास अंकाचा आराखडा मांडताना कोणकोणते विभाग करावे ते लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कार्याप्रमाणे जाहिरातीचे वर्गीकरण कसे केले जाते ते स्पष्ट करा. 5

ब) चित्र व छायाचित्र याविषयी थोडक्यात माहिती द्या. 5

क) कृषी–पुरवणीची मांडणी करताना कोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो ते स्पष्ट करा. 5

ड) संपादकांचे प्रकार लिहून मुख्य संपादक या प्रकाराविषयी माहिती द्या. 5

इ) मूल्यमापन म्हणजे काय ते लिहून छापील साहित्याच्या मूल्यमापनाची गरज का भासते ते लिहा. 5

✦✦✦✦✦✦✦